आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१६ जुलै २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- पंढरपुरात उद्याच्या आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज उत्तररात्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा
- वादग्रस्त आय ए एस अधिकारी पूजा खेडकर यांचं प्रशिक्षण स्थगित, २३ जुलैच्या आत  मसुरीच्या राष्ट्रीय प्रशासन अकादमीत परतण्याचा आदेश
- मुंबई- पुणे महामार्गावर बस अपघातात ५ जणांचा मृत्यू /मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रूपयांची मदत, तसंच जखमींच्या उपचाराचा खर्च सरकार करणार

**आणि**

- येत्या दोन दिवसात राज्याच्या चारही विभागांमधे पाऊस, तर मुंबई शहर आणि उपनगरात काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता

**<><><><><>**

आषाढी एकादशी उद्या साजरी होत आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पंढरपूर दौऱ्यावर असून, त्यांच्या हस्ते आज उत्तररात्री अडीचच्या सुमाराला श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा केली जाणार आहे.

यानिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा आणि व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली “समन्वय समिती” गठीत करण्यात आली आहे. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, तसंच सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत या समितीत सदस्य म्हणून काम पाहणार आहेत.

आषाढीवारी निमित्त राज्यातील अनेक मंत्री उपस्थित राहणार आहेत. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कुटुंब आणि आरोग्य कल्याण राज्यमंत्री

प्रतापराव जाधव, महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेच्या उपाध्यक्ष नीलम गोऱ्हे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक मंत्री आणि मंत्रालयातले प्रमुख अधिकारी यात्रेसाठी पंढरपूरात दाखल झाले आहेत.

आषाढी वारीसाठी आज मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकातून भाजपाच्या वतीनं नमो एक्स्प्रेस ही गाडी भाविकांना घेऊन पंढरपूरला रवाना झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या गाडीला झेंडा दाखवला.

<><><><><>

वादग्रस्त आय ए एस अधिकारी पूजा खेडकर यांचा जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रम स्थगित करण्याचा आदेश लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन  अकादमीनं जारी केला आहे. पुढच्या कार्यवाहीसाठी २३ जुलैच्या आत  मसूरी इथं अकादमीत परतण्याचा आदेशही आकादमीच्या पत्रात दिला आहे. त्यानुसार त्यांना राज्य शासनानं जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रमातून मुक्त केलं आहे.

पूजा खेडकर यांच्यावर दिव्यांगत्वाचं खोटं प्रमाणपत्र, उत्पन्नाचा खोटा दाखला दिल्याचा आरोप आहे. खेडकर यांच्या विरोधात दिव्यांग कर्मचारी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले यांनी राज्य दिव्यांग आयुक्तालयाकडे तक्रार केली होती. केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पूजा यांनी सादर केलेलं दिव्यांग प्रमाणपत्र संशयास्पद असल्याचं आढळल्यानंतर त्यांच्या वैद्यकीय तपासणीचे आदेश आयोगानं दिले होते. त्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारनं त्यांची बदली वाशीम इथं केली होती.

<><><><><>

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं येत्या रविवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरळीत व्हावं यासाठी सत्ताधारी विरोधी पक्षांकडून या बैठकीत सहकार्य मागणार आहेत. येत्या २२

तारखेपासून हे अधिवेशन सुरू होणार आहे. १२ ऑगस्टला त्याची सांगता होईल. २३ जुलै रोजी अर्थमंत्री संसदेत अर्थसंकल्प मांडतील. तिसऱ्या वेळी प्रधानमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती एन कोटीश्र्वर सिंग आणि आर महादेवन यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. न्यायमूर्ती एन कोटीश्र्वर सिंग सध्या जम्मू काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आहेत. तर न्यायमूर्ती आर महादेवन मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आहेत.

<><><><><>

ओबीसी आरक्षण तसंच अन्य मागण्यांसाठी वंचित बहुजन आघाडी येत्या २५ जुलैपासून आरक्षण बचाव यात्रा काढणार आहे. पक्षाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. मुंबईत चैत्यभूमी इथून या यात्रेला सुरुवात होणार असून विदर्भ, मराठवाड्याच्या विविध जिल्ह्यातून या यात्रेचा प्रवास होईल. ८ ऑगस्टला छत्रपती संभाजीनगर इथं यात्रेची सांगता होणार आहे.

एसटी, एससी शिष्यवृत्ती वाढ व्हावी, ओबीसी विद्यार्थ्यांना एसटी एससी शिष्यवृत्ती लागू करावी, तसंच जे कुणबी आहेत त्यांना आरक्षण मिळावं, या मागण्यांचा या यात्रेच्या माध्यमातून प्रचार करणार असल्याचं प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं. यासाठी यात्रेदरम्यान ठिकठिकाणी कॉर्नर बैठका तसंच मुक्कामाच्या ठिकाणी जाहीर सभा घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यातल्या भोकर, अर्धापूर, मुदखेड तालुक्यासह जिल्ह्यातल्या सर्वच जल जीवन मिशन अंतर्गत सुरु असणाऱ्या पाणी पुरवठा योजनांची कामं जलद गतीनं करावीत, तसंच या योजनांच्या कामांचा सद्यस्थितीचा अहवाल तातडीनं सादर करावा असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. मंत्रालयातल्या समिती कक्षात नियोजन विभाग, वित्त विभाग तसंच पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

कोल्हापूर जिल्ह्यातल्या शिरोळ तालुक्यातल्या क्षारपड जमिनींच्या सुधारणेसंदर्भातही त्यांनी आज मंत्रालयात बैठक घेतली. याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करून तो शासन मान्यतेसाठी तातडीनं पाठवावा, त्याला प्रशासकीय मान्यतेसह आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यातल्या वडलापेठ इथं उभारल्या जाणाऱ्या पोलाद प्रकल्पाचं उद्घाटन उद्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत या संकल्पनेनुसार साडे तीनशे एकर जमिनीवर हा प्रकल्प होत असल्याची माहिती सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष सुनील जोशी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

<><><><><>

मुंबई- पुणे महामार्गावर आज सकाळी झालेल्या बस अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला. जखमी झालेल्या ४५ प्रवाशांना कळंबोलीच्या एमजीएम रुग्णालयात

दाखल करण्यात आलं आहे. यापैकी ७ जणांची प्रकृती सुधारल्यानं त्यांना घरी सोडण्यात आलं आहे. आषाढी एकादशीनिमित्त डोंबिवलीहून पंढरपूरला जाणारी बस ट्रॅक्टरला धडकून दरीत कोसळली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज कळंबोलीतल्या एमजीएम रूग्णालयात भेट देऊन रूग्णांची चौकशी केली. सरकारकडून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रूपयांची मदत, तसंच जखमींच्या उपचाराचा खर्च सरकार करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. ट्रॅक्टरसाठी बंदी असताना महामार्गावर ट्रॅक्टर कसा आला याची चौकशी केली जाणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

<><><><>

राज्यात मराठा आणि ओबीसी संघर्ष होऊ द्यायचा नसेल तर राज्यातील सर्व राजकीय पक्षांनी जबाबदारीने भूमिका स्पष्ट केली पाहिजे. महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांनी त्यांची भूमिका महाराष्ट्रापुढे स्पष्ट करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी आज वार्ताहर परिषदेत केली.

विरोधी पक्षाकडे मराठा समाजाला ओबीसीमधून सरसकट आरक्षण देण्याचा कोणता कायदेशीर मार्ग आहे, हे त्यांनी महाराष्ट्राला सांगावं, असं आवाहनही पाटील यांनी यावेळी केलं.

<><><><>

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य आज रत्नागिरीच्या दौऱ्यावर होते. उपविभागीय स्तरावर तिलोरी कुणबी जातीचे दाखले प्रलंबित नाहीत, याबद्दल सदस्यांनी समाधान व्यक्त केलं. तसंच, कोणत्याही विद्यार्थ्याचं शैक्षणिक नुकसान

होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसंच जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने संदर्भ आणि अभिप्रायासह वस्तुनिष्ठ अहवाल तातडीने आयोगाला सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकणात काही ठिकाणी जोरदार, तर तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी, तर मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

येत्या २४ तासात मुंबई शहर आणि उपनगरात मध्यम पाऊस पडेल, तर संध्याकाळी किंवा रात्री काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता कुलाबा वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**